शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग
शासन शुद्धीपत्रक क्र.जाहिरात-२०१०/प्र.क्र.१०४/का.३४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि. २६ ऑगस्ट, २०१०

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/का.३४,दि. ३१/८/२००९

शासन शुद्धीपत्रक

वर नमूद केलेल्या शासन निर्णय क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/का.३४,दि.३१/८/२००९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :

(१) उपरोक्त दि. ३१/८/२००९ च्या संदर्भातील वाचा मध्ये **"अ.क्र.६ च्या नंतर अ.क्र.७ म्हणून शासन पूरक पत्र सा.प्र.वि. क्र. जाहिरात-२००८/७३८/प्र.क्र.८०/का.३४, दि.१३/८/२००८" असे वाचावे.**

(२) सदर दि. ३१/८/२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-१ मधील अ.क्र.६ खालीलप्रमाणे सुधारित स्वरुपात वाचण्यात यावा :

**"दि. १ मे २००१ च्या शासन निर्णयाद्वारे विहित केलेले जाहिरातींचे दर हे कृष्णधवल जाहिरातीचे दर आहेत. रंगीत जाहिरातीचे दर दि. १ मे २००१ च्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आले नव्हते. आता रंगीत जाहिरातींसाठी जाहिरात आणि दृष्य प्रसिद्धी संचालनालयाच्या [DAVP] धर्तीवर कृष्णधवल जाहिरातींच्या दरावर ४०% अधिक दर अनुज्ञेय राहतील."**

(३) दि. ३१/८/२००९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १ मधील अ.क्र.१२ च्या तक्त्यातील अ.क्र.३ समोरील रकाना क्र.४ मध्ये १ च्या नंतर २ म्हणून खालीलप्रमाणे मजकूर वाचण्यात यावा.

**"अ वर्ग दैनिकाबरोबरच संबंधित विभागातील अ वर्गातील साप्ताहिकांना त्यांच्या प्रसिद्धीचा दिनांक व वार विचारात घेवून वर्गीकृत जाहिरात वितरित करण्यात याव्यात. त्या त्या विभागातील अ वर्ग दैनिकांच्या रोटेशनमध्ये शेवटच्या क्रमांकावर अ वर्ग साप्ताहिकांचा समावेश करुन जाहिराती देण्यात येतील. अशा प्रसंगी त्या जाहिरातीसाठी पुरेसा अवधी ठेवण्यात आला आहे, याची खात्री करुन घेण्यात यावी."**

(४) दि.३१/८/२००९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद-१ च्या अ.क्र. १८ मध्ये **"शासनमान्य यादीत समाविष्ट नसलेल्या दैनिकांना व साप्ताहिकांना एका आर्थिक वर्षात शासनाने नियम १६-क नुसार ठरविलेल्या प्रसंगी ५ दर्शनी जाहिरांतीबरोबर अन्य ५ अशा एकूण १० दर्शनी जाहिराती देण्यात येतील. पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, अर्ध वार्षिके यासारख्या नियतकालिकांना एका आर्थिक वर्षात ५ पर्यंत दर्शनी जाहिरातीचे वितरण करता येईल."** या मजकूराऐवजी **"शासनमान्य यादीत समाविष्ट नसलेल्या दैनिकांना व साप्ताहिकांना एका आर्थिक वर्षात नियम क्र. १६ क नुसार ठरविलेल्या प्रसंगी शासनाच्या ४ दर्शनी जाहिराती देता**

क्र.मा.प..)

येतील. पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, अर्धवार्षिके, वार्षिके यासारख्या नियतकालिकांना एका आर्थिक वर्षात ४ पर्यंत दर्शनी जाहिरातींचे वितरण करता येईल." असा मजकूर वाचण्यात यावा. तसेच सदर परिच्छेदातील(अ) आणि (ब) खालीलप्रमाणे सुधारित स्वरुपात वाचण्यात यावा.

(अ) दैनिकांच्या अर्जासोबत लगतचे १० अंक, साप्ताहिकांच्या अर्जासोबत मागील ३ महिन्यातील किमान १० अंक जोडणे आवश्यक आहे.

(ब) पाक्षिके/मासिके/त्रैमासिके/अर्धवार्षिके आणि वार्षिके यांनी पाठीमागील लगतचे ३ अंक जोडणे आवश्यक राहील.

२. हे आदेश दिनांक ३१/८/२००९ पासून अमलात येतील.

३. हे शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००८२६१४५४८००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(कुं. नं. घाटगे)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंडळे/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या स्वायत्त संस्था,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
संचालक (माहिती), नागपूर-अमरावती विभाग, नागपूर
संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, औरंगाबाद,
संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
उपसंचालक (माहिती), नाशिक, पुणे, लातूर,अमरावती, कोकण, कोल्हापूर विभाग,
सर्व जिल्हा माहिती अधिकारी,
सर्व उप माहिती कार्यालये,
निवडनस्ती.

*पत्राने